जमिनीच्या अकृषिक वापरासाठी परवानगी
देताना वापरावयाच्या प्रचलीत पध्दतीत
सुधारणा करणेबाबत.....

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक - एनएपी-२००७/प्र.क्र.८२/ल-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १ जानेवारी, २००८

वाचा :- १) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक-एनएपी-१०८८/प्र.क्र.१२७५/ल-२, दिनांक १२ ऑक्टोबर, १९८८.
२) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक-एनएपी-१००१/प्र.क्र.३४/ल-२, दिनांक १३/११/२००१.

परिपत्रक :-

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ अंतर्गत विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार अकृषिक परवानगी जिल्हाधिका-यांकडून देण्यात येते. अकृषिक परवानगी देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ४४ अंतर्गत विविध खात्यांचे "ना-हरकत" दाखले प्राप्त करुन घेऊन अकृषिक परवानगी दिली जाते. अकृषिक परवानगीच्या कार्यपध्दतीचे जनतेकडून तसेच क्षेत्रीय स्तरावरील अधिका-यांकडून प्राप्त सूचनांनुसार वेळोवेळी सुलभीकरण करण्यात आलेले आहे. अकृषिक परवानगी देण्याच्या कार्यपध्दतीचे सुलभीकरण केल्यामुळे अर्जदारास अकृषिक परवानगीसाठी लागणारा कालावधी ब-याच अंशी कमी झाला आहे. या अनुषंगाने शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक-एनएपी-१०८८/प्र.क्र.१२७५/ल-२, दिनांक १२/१०/१९८८ व शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक-एनएपी-१००१/प्र.क्र.३४/ल-२, दिनांक १३/११/२००१ अन्वये क्षेत्रीय स्तरावरील अधिका-यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार अर्जदारास अकृषिक परवानगी देताना असे अपेक्षीत आहे की, अर्जदाराने ज्या संबंधीत जागेसाठी अकृषिक परवानगी मागितलेली आहे, त्या संपूर्ण जागेचा ले-आऊट अकृषिक परवानगी मागितलेल्या अर्जासोबत इतर आवश्यकत्या सर्व कागदपत्रांसह जोडला असला पाहिजे. तद्नंतर कागदपत्रांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी सर्व संबंधित विभागांकडून ना-हरकत दाखले मागवितात. सदर कागदपत्रांमध्ये अर्जदाराने त्याच्या अर्जासोबत जोडलेला ले-आऊटचा नकाशा शिफारशीसाठी नगररचनाकाराकडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पाठविणे अपेक्षीत असते. नगररचनाकार सदर ले-आऊट नकाशास दुरुस्तीसह अथवा दुरुस्तीशिवाय विविध अटी व शर्तीसह शिफारस देतात किंवा शिफारस नाकारुन जिल्हाधिकारी यांना त्याप्रमाणे कळवितात.

३.. तथापि, कांही जिल्हाधिकारी कार्यालये, नगररचना कार्यालयाकडून ले-आऊट मंजूर करुन घेण्याचे अटीवर अकृषिक परवानगीचे आदेश निर्गमित करतात असे कांही तारांकित/अतारांकित प्रश्नांच्या माध्यमातून उघडकीस आले आहे. अशा रितीने अकृषिक परवानगी देण्याची कार्यपध्दती पूर्णतः चुकीची आहे.

शाखा:-
आवक नं.:- RB/E २९२६
9 JAN 2008
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-

paripatrak

RDC
A प्रमाणे कार्यवाहीसाठी

३/४४

४. वस्तुतः अकृषिक परवानगी देणेपूर्वी, ज्या जागेला अकृषिक परवानगी अपेक्षिण्यात आलेली आहे त्या जागेचा अभिन्यास (ले-आऊट) नगर रचना विभागाकडून मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. केवळ प्रस्तावित जागेवर अकृषिक वापर अनुज्ञेय आहे याबाबत नगर रचना विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन अकृषिक परवानगी द्यायची व या अकृषिक परवानगीमध्ये जागेचा अभिन्यास नगर रचना विभागाकडून मंजूर करुन घेण्याची अट समाविष्ट करावयाची, ही कार्यपध्दती पूर्णतः चूकीची आहे.

५. उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, जिल्हाधिकारी यांनी अकृषिक परवानगीसाठी प्राप्त झालेल्या अर्जाबाबत शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांक-एनएपी-१०८८/प्र.क्र.१२७५/ल-२, दिनांक १२/१०/१९८८ व शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक-एनएपी-१००१/प्र.क्र.३४/ल-२, दिनांक १३/११/२००१ अन्वये दिलेल्या सूचनांचा काटेकोरपणे अवलंब करावा. तसेच या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करताना, ज्या जागेला अकृषिक परवानगी अपेक्षिण्यात आलेली आहे त्या जागेचा अभिन्यास (ले-आऊट) नगररचना विभागाकडून मंजूर झाल्याशिवाय व तो नगररचना विभागाने प्रमाणीत केल्याशिवाय प्रश्नाधीन जमीनीस अकृषिक परवानगीचे आदेश निर्गमित करु नयेत.

६. हे आदेश नगरविकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(अविनाश हजारे)
उप सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी,
२) सर्व विभागीय आयुक्त,
३) अवर सचिव, नगरविकास विभाग (नवि-१३), मंत्रालय, मुंबई,
४) निवडनस्ती, ल-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

क्र महा/कार्या/बिनशेती/धरणी/४५०८
जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी दि २८।१०८

प्रति,

उपविभागीय अधिकारी (सर्व)
तहसिलदार (सर्व) यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
य रेखांकनातील कार्यवाही करताना शासन परिपत्रकातील अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

जिल्हाधिकारी रत्नागिरी करिता